महाराष्ट्र शासन

क्रमांक : वाहन(विक्री)२०१५/प्र.क्र.१५०/आस्था-०२

सहकार, पणन व वस्त्राद्योग विभाग,
३ रा मजला (विस्तार इमारत), दालन क्र.३३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : २२७९ ३०८७
दिनांक : १ जानेवारी, २०२०

निविदा सूचना

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत सन २००७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या त्यांच्या कार्यालयातील **वाहन क्रमांक MH-०१-SA-४०४० (फोर्ड फ्युजन) या जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता दिनांक मोहोरबंद निविदा मागविण्याबाबतची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या याच संकेतस्थळावर दिनांक २२.११.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली** आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. डिएफपी१०१६/प्र.क्र.०७/१६/विनियम दिनांक २२.६.२०१६ मधील परि. ३ मधील तरतूदींच्या अधीन राहून **सदर निविदा सूचनेस याअन्वये खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-**

सदर **निविदा गुरुवार, दिनांक २ जानेवारी, २०२० ते शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२० या कालावधीत कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० या वेळेमध्ये पोहोचतील अशा पध्दतीने मोहोरबंद पाकीटातून पाठवाव्यात**. विहीत वेळेमध्ये प्राप्त होणाऱ्या निविदा दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी दुपारी ३.०० वाजता उप सचिव (आस्था-२) यांचे समक्ष उघडण्यात येतील. या निविदांबरोबरच यापूर्वी याच वाहनाबाबत दिनांक २२.११.२०१९ रोजी देण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या ४ निविदा वाहन विक्रीच्या वेळी ग्राहय धरण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाकारास वा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीस, तसेच, याच वाहनासंदर्भात यापूर्वी निविदा सादर केलेल्या निविदाकरास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

३. दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग) गिरवणे ,(पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

४. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार, उप सचिव, आस्थापना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: CN = Sudin Gaikwad, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-Operation Marketing and Textiles Department
Date: 2020.01.01 16:08:03 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

महाराष्ट्र शासन

क्रमांक:वाहन(विक्री)२०१५/प्र.क्र.१५०/आस्था-२
सहकार, पणन व वस्त्राद्योग विभाग,
३ रा मजला (विस्तार इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ जानेवारी, २०२०

निविदा संदर्भात नियम व अटी

अ. क्र.	**नियम व अटी**
१.	उप सचिव (आस्था-२), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई असे नाव पाकीटावर घालून व ते पाकीट मोहोरबंद करून निविदा समक्ष **गुरुवार, दिनांक २ जानेवारी, २०२० ते शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२०** या कालावधीत कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० या वेळेमध्ये कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा), दालन क्रमांक ३३४ (विस्तार), तिसरा मजला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करावी. त्यावर "वाहन क्रमांक MH-०१-SA-४०४० (फोर्ड फ्युजन) च्या विक्रीसाठी निविदा " असा स्पष्ट उल्लेख असावा.
२.	" जसे आहे त्या स्थितीत " विक्रीकरिता असलेले क्रमांक MH-०१- SA-४०४० (फोर्ड फ्युजन) हे वाहन तपासणीसाठी नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबईच्या आवारात ठेवण्यात आले आहे.
३.	ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी त्यांची निविदा कोणत्याही **शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२०** रोजी दुपारी ४.३० पर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.
४.	आदेशिका शुल्क (Processing Fee) रक्कम रु.५००/- (प्रत्येक निविदेस) कक्ष अधिकारी, रोखशाखा, दालन क्रमांक ३५९ (विस्तार), तिसरा मजला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे जमा करावी.
५.	आदेशिका शुल्क रक्कम भरल्यानंतर कक्ष अधिकारी, रोखशाखा, दालन क्रमांक ३५९ (विस्तार), तिसरा मजला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांच्याकडून प्राप्त झालेली पावती, निविदा अर्जाबरोबर जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
६.	निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर रहाता येईल.
७.	यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एक आठवड्यात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल .
८.	यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो कर भरावा लागेल किंवा वाहनाचा प्रत्यक्ष ताबा मिळण्यापूर्वी कर भरल्याबाबतचा लेखी पुरावा सादर करावा लागेल.
९.	यशस्वी निविदाधारकास, नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल.
१०.	कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार **उप सचिव(आस्थापना) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांना राहिल.**
११.	सदर शासकीय वाहन च्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.
१२.	प्रशासकीय किंवा तांत्रिक कारणास्तव उक्त निविदा सादर करावयाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: CN = Sudin Gaikwad, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-Operation Marketing and Textiles Department
Date: 2020.01.01 16:08:22 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

दिनांक -

प्रति,
उप सचिव (आस्थापना-२),
दालन क्रमांक ३१७ (विस्तार), तिसरा मजला,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

विषय : शासकीय वाहन क्रमांक एमएच-०१-एसए-४०४० (फोर्ड फ्युजन) च्या विक्रीसंदर्भात निविदा सादर करणेबाबत..

महोदय,

१	**निविदा क्रमांक**	:	**कार्यालयासाठी राखीव**
२	निविदाधारकाचे नाव	:	
३	निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक	:	
४	निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक	:	
५	विक्रीकर नोंदणी क्रमांक	:	
६	आदेशिका शुल्क रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक	:	
७	निविदा सादर करावयाचा दिनांक	:	**गुरुवार दिनांक २ जानेवारी, २०२० ते शुक्रवार, दिनांक १० जानेवारी, २०२०** या कालावधीत कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत
८	निविदा उघडण्याची तारीख	:	दिनांक १३ जानेवारी, २०२० दुपारी ३.०० वाजता

आपली निविदा सूचना क्रमांक : वाहन(विक्री)२०१५/प्र.क्र.१५०/आस्था-०२ च्या संदर्भात उप सचिव (आस्थापना-२), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या आणि निविदा नमुन्यासोबत जोडलेल्या नियम व अटींनुसार मी / आम्ही वाहन क्रमांक **एमएच-०१-एसए-४०४० (फोर्ड फ्युजन)** हे रुपये ----------/- (अक्षरी रुपये ---------- फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

मला / आम्हाला निविदेबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य आहेत.

आपला विश्वासू,

(नाव व निविदाधारकाची सही)
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक

टीप :- कंपनीच्या वतीने वाहन खरेदी करणार असल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.